boalnashik2025@gmail.com

# दैनिक बोल नाशिक

PRGI No. MHBIL/25/-2129

प्रत्येक बातमीचा नि:पक्ष खुलासा

● मुख्यसंपादक : प्रशांत हिरे शनिवार । दि.८ ऑगस्ट २०२६ ● वर्ष : १ ले ● अंक : २२३ ● पाने : ४ ● किंमत : २ रु. ● संपादक : मायकल खरात ● कार्यकारी संपादक : देविदास बैरागी

## संक्षिप्त...

### देवनदीचे पूरपाणी खोपडी-मिरगाव पूरचारीतून मोठ्या बंधाऱ्यात

**सिन्नर ।** माजी कृषिमंत्री आमदार माणिकराव कोकाटे यांच्या पाठपुराव्यामुळे देवनदीचे पूरपाणी खोपडी-मिरगाव या २६ कि.मी. अंतराच्या पूरचारीमार्गे मिरगाव येथील मोठ्या बंधाऱ्यात यशस्वीरीत्या पोहोचल्याने परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या ऐतिहासिक जलप्रवाहाचे औचित्य साधत बंधाऱ्यावर जलपूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्या सीमांतिनी कोकाटे यांच्या हस्ते विधिवत जलपूजन करण्यात आले. जलसंपत्तीचे संवर्धन, पाण्याचा योग्य वापर आणि शेतीला शाश्वत पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीचे विद्यमान व माजी पदाधिकारी, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच पूरचारीच्या पाण्याचा लाभ घेणारे शेतकरी आणि लाभार्थी उपस्थित होते.

### लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटीचा वनमहोत्सवात उत्स्फूर्त सहभाग

**सिन्नर ।** येथील वनप्रस्थ फाउंडेशनच्या वतीने मुसळगाव येथील स्व. मारुती चिंतामणपल्ली स्मृतिवन (मारुती वन) येथे आयोजित वनमहोत्सवांतर्गत वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटीच्या पदाधिकारी व सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्लबच्या अध्यक्षा स्मिता थोरात यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड आणि संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी क्लबच्या सचिव वैशाली सानप यांनी वृक्षारोपण उपक्रमात सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल वनप्रस्थ फाउंडेशनचे आभार मानले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सदस्यांचेही त्यांनी कौतुक केले. उपक्रमास संगीता वाजे, डॉ. अरुण थोरात, सोपान परदेशी, डॉ. राजेंद्र भरीतकर, मीनाक्षी भरीतकर, मनीष गुजराथी, प्रशांत (गोपी) शिंदे, अथर्व (ओम) सानप तसेच वनप्रस्थ फाउंडेशनचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चांदोरीचे ग्रामपंचायत अधिकारी सुरेश भांबरे यांची पूरस्थितीतील उत्कृष्ट कामगिरी

**सिन्नर ।** अतिवृष्टी व पूरपरिस्थितीचा सर्वाधिक फटका बसणाऱ्या चांदोरी परिसरात आपत्ती व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने केलेल्या नियोजनबद्ध कामाची दखल नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी घेतली. पूरपरिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी चांदोरी येथे भेट दिल्यानंतर त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी सुरेश भांबरे यांनी गेल्या काही वर्षांपासून पूरग्रस्तांच्या सुरक्षिततेसाठी तसेच आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले. आपत्ती व्यवस्थापनातील नियोजन, समन्वय आणि तत्परतेबद्दल त्यांनी सम ाधान व्यक्त करत भांबरे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. याप्रसंगी निफाड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांचीही उपस्थिती होती. त्यांनीही पूरपरिस्थिती हाताळताना ग्रामपंचायत प्रशासनाने केलेल्या कामाचे कौतुक केले. यावेळी आपत्ती व्यवस्थापनात कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देत मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी जनतेच्या सुरक्षिततेसाठी तत्परतेने काम करण्याचे आवाहन केले. त्यांच्या या कौतुकामुळे ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्साह आणि मनोबल निश्चितच उंचावल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# महाकुंभ तोंडावर रिलॅक्स नको
# मुख्यमंत्र्यांचा अधिकाऱ्यांना खडेबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था आणि खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासकीय यंत्रणेला चांगलेच धारेवर धरले आहे. शुक्रवारी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कुंभमेळ्याच्या पूर्वतयारी आढावा बैठकीत मुख्यमंत्री संतापले. महाकुंभ तोंडावर असताना असे रिलॅक्स राहून चालणार नाही. लोकांना तांत्रिक कारणे सांगू नका, तर कामातून प्रत्यक्ष तोडगा काढून द्या, अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले.



### ५ नागरिकांचा बळी

कुंभमेळ्याच्या विकासकामांमुळे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील रस्त्यांची पूर्ण दुरवस्था झाली आहे. जागोजागी खड्डे पडल्याने आतापर्यंत ५ निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून अनेक गंभीर अपघात झाले आहेत. त्यामुळे नाशिककरांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र संताप आहे. बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री गिरीश महाजन, मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, ड. राहुल ढिकले, सरोज आहिरे, हिरामण खोसकर, महापौर हिमगौरी आहेर-आडके आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**१ महिन्याचा अल्टीमेटम**

इतका मोठा निधी खर्च करूनही नागरिकांचा रोष येत असेल तर आत्मपरीक्षण करा. खड्डे बुजवण्याची जबाबदारी असलेल्यांवर आणि कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. अधिकाऱ्यांनी फील्डवर जाऊन काम करावे असेही बजावले. पुढील १ महिन्यानंतर पुन्हा आढावा घेऊन गुणात्मक सुधारणा न दिसल्यास गंभीर कारवाईचा इशारा देण्यात आला.

**१०-१२ कोटी भाविकांची अपेक्षा**

मंत्री गिरीश महाजन म्हणाले, यंदा १० ते १२ कोटी भाविक येण्याची शक्यता आहे. कुंभासाठी ४० हजार कोटींची कामे होत आहेत. पावसातही युद्धपातळीवर खड्डे बुजवून रस्ते वाहतूकयोग्य केले जातील.

## एकाला अटक
## गोंदे फाट्यावरील हॉटेलवर छापा
# १६ किलो आफू जप्त

**सिन्नर । प्रतिनिधी**

नाशिक-पुणे महामार्गावर अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांविरोधात नाशिक ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

सिन्नर तालुक्यातील गोंदे फाटा येथील हॉटेलमध्ये आफूची विक्री होत असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून १६.९९२ किलो आफूचा साठा जप्त केला. या प्रकरणी एका तरुणाला अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सिन्नर परिसरात गस्त घालत होते. यावेळी गुप्त माहिती मिळाली की, गोंदे शिवारातील हॉटेल रेणुका माता राजस्थानी ढाबा येथे बेकायदेशीरपणे आफू नावाचा अंमली पदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आला आहे. माहितीच्या आधारे पथकाने वावी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोंदे फाटा येथील हॉटेलवर पंच व फॉरेन्सिक पथकासह धाड टाकली.

यावेळी पोलिसांनी अंकित वंशपती साकेत, वय २३, रा. रामपुर बाघेलान, जि. सतना, मध्यप्रदेश याला ताब्यात घेतले. तो सदर हॉटेलमध्ये कामाला होता. त्याच्याकडून पांढऱ्या गोणीत ठेवलेला १६९९२ किलो डोडा पावडर जप्त करण्यात (*** पान २ वर)

# कमिशनसाठीच कुंभमेळ्याची कामे, खड्ड्यांमुळे जीव गेले तरी प्रशासन गप्प : राज ठाकरे

**नाशिक । प्रतिनिधी**

कुंभमेळ्यासाठी सुरू असलेल्या कामांमध्ये कमिशनखोरी हाच सर्वात महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे खड्ड्यांमुळे नागरिकांना जीव गमवावा लागत असूनही प्रशासनाला त्याचे कोणतेही सोयरेसुतक नाही. कुंभमेळ्याची बहुतांश कामे गुजरातच्या कंत्राटदारांना दिल्याचा आरोप करीत मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी, महाराष्ट्रात कंत्राटदार जन्मालाच आले नाहीत का असा खोचक सवाल केला. दोन दिवसीय नाशिक दौऱ्यावर आलेल्या राज ठाकरे यांनी शुक्रवारी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. कुंभमेळा कामांमुळे निर्माण झालेल्या नाशिकमधील बिकट परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी २०१५ च्या कुंभमेळ्यातील कामे आणि सध्याच्या कामांची तुलनात्मक मांडणी केली. मागील कुंभमेळ्यावेळी नाशिक महापालिकेत मनसेची सत्ता होती. तेव्हा कुंभमेळ्यासाठी अशा प्रकारे कामे करण्यात आली की, नाशिककरांना कुठे आणि कोणती कामे सुरू आहेत, हेही जाणवले नव्हते. कामे पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांसह झालेला विकास सर्वांना दिसला. २०१५ च्या कुंभमेळ्यात पारदर्शकपणे आणि नागरिकांना त्रास न होता कामे झाली होती. त्यामागे पैसे कमावणे हा उद्देश नव्हता. यावेळी मात्र परिस्थिती पूर्णपणे विपरीत आहे. मालमोटारी आणि इतर वाहने खड्ड्यांत जात आहेत, वाहनधारकांना जीव गमवावा लागत असूनही प्रशासन शांत आहे. या सर्व कामांतून कमिशन कसे मिळेल, हाच त्यांच्यासाठी महत्त्वाचा भाग असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला.

वरून आदेश येतील, त्यानुसार कुंभमेळ्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्रातील सर्व गोष्टी वरूनच हाताळल्या जात असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. कुंभमेळ्याच्या बहुतांश कामांचे ठेकेही गुजरातच्या कंत्राटदारांना दिल्याची आपल्याला माहिती असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणजे महाराष्ट्रात कंत्राटदार जन्मालाच आले नाहीत का? असा टोला त्यांनी सत्ताधाऱ्यांना लगावला.



### ...तर त्रास भोगावा लागणार

सत्ताधाऱ्यांनी नाशिकची केलेली दुर्दशा पाहून वाईट वाटते. बोटॅनिकल गार्डन असो किंवा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने उभारलेले संग्रहालय असो, हे प्रकल्प केवळ दुसऱ्याने केले म्हणून त्यांची वाट लावली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. स्मार्ट सिटीचे काय झाले, असा प्रश्न उपस्थित करत सगळी शहरे बरबाद केली जात असल्याची टीका त्यांनी केली. मतदारांनी याचा विचार केला पाहिजे. नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली. त्या विरोधात आंदोलने होऊनही प्रशासन ढिम्म राहिले. अशा परिस्थितीत मतदार पुन्हा भाजपलाच निवडून देत असतील, तर त्यांनी हा त्रास भोगावाच, अशा शब्दांत त्यांनी सुनावले.

## आपत्कालीन प्रसंगाव्यतिरिक्त रेल्वेची 'अलार्म चेन' ओढाल तर कारवाई!

### भुसावळ विभागात चार महिन्यांत ७२२ प्रकरणे;
### ६७४ जणांवर कारवाई, दोन लाखांचा दंड वसूल



**नाशिकरोड । प्रतिनिधी**

रेल्वे गाड्यांमधील 'अलार्म चेन पुलिंग'ची सुविधा प्रवाशांच्या सुरक्षेसाठी केवळ आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यासाठी आहे. मात्र, अनेक प्रवासी किरकोळ अथवा अनावश्यक कारणांसाठी या सुविधेचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारांमुळे रेल्वे वाहतुकीचे वेळापत्रक विस्कळीत होऊन शेकडो प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे अलार्म चेनचा गैरवापर करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक तसेच कारावासाची कारवाई करण्यात येत असून, प्रवाशांनी नियमांचे पालन करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

चुकून अलार्म चेन ओढणे, एखादा प्रवासी वेळेत गाडीत चढू न शकल्याने गाडी थांबविण्यासाठी चेन ओढणे, मोबाईल किंवा अन्य वस्तू खाली पडणे अथवा इतर किरकोळ कारणांसाठी अलार्म चेनचा वापर करणे नियमबाह्य आहे. केवळ आपत्कालीन परिस्थितीतच या सुविधेचा वापर करावा, असे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अलार्म चेन पुलिंगमुळे संबंधित गाडीला विलंब होण्याबरोबरच तिच्यामागे किंवा पुढे धावणाऱ्या अन्य गाड्यांच्या वाहतुकीवरही परिणाम होतो.

परिणामी शेकडो प्रवाशांना विलंब, गैरसोय आणि मनस्ताप सहन करावा लागतो. एप्रिल ते जुलै २०२६ या चार महिन्यांच्या कालावधीत भुसावळ विभागात अलार्म चेन पुलिंगची तब्बल ७२२ प्रकरणे नोंदविण्यात आली. यापैकी ६७४ व्यक्तींवर कारवाई करून त्यांना दोषी ठरविण्यात आले असून, त्यांच्याकडून सुमारे दोन लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. रेल्वेची अलार्म चेन ही प्रवाशांच्या सुरक्षेसाठीची सुविधा असून, तिचा गैरवापर केल्यास स्वत:सह इतर प्रवाशांचीही गैरसोय होते. त्यामुळे आपत्कालीन परिस्थिती वगळता अलार्म चेन ओढू नये, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.



## निदाला लपविल्याप्रकरणी मतीन पटेलला
# १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**नाशिक । प्रतिनिधी**

बहुचर्चित टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि धार्मिक भावना दुखावण्यासंबंधित दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजी नगरमध्ये आश्रय दिल्या प्रकरणी एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेल याला नाशिक पोलिसांनी अटक केली. शुक्रवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असता १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली. टीसीएस प्रकरणात मुंबई नाका आणि देवळाली कॅम्प या दोन पोलीस ठाण्यात महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि धार्मिक भावना दुखावण्यासंदर्भात नऊ गुन्हे (*** पान २ वर)

### आठ आरोपींपैकी ५ जणांना जामीन

टीसीएस प्रकरणातील आठ आरोपींपैकी पाच जणांना जामीन मंजूर झाला असून दानिश शेखसह तिघांचा जामीन न्यायालयाने फेटाळला आहे. या प्रकरणी देवळाली कॅम्प व मुंबई नाका पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात बलात्काराचा एक गुन्हा दाखल आहे. दानिश शेख याच्याविरुद्ध दोन, तर तौसिफ अत्तार याच्याविरुद्ध सहा गुन्हे दाखल आहेत. अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये रझा मेमन याला चार गुन्ह्यांत, शाहरुख कुरेशी याला तीन गुन्ह्यांत, अश्विनी चैनानी याला एका गुन्ह्यात, आसिफ अन्सारी याला जामीन मंजूर झाला आहे. निदा खान हिला एका गुन्ह्यात जामीन मंजूर झाला असून अन्य एका प्रकरणात नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच शफी शेख याला सर्व गुन्ह्यांत जामीन मंजूर झाला आहे.

# नाशिकहून अयोध्या-वैष्णोदेवीला थेट रेल्वे? भाविकांना मोठा दिलासा

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक ते पुणे सरळ रेल्वेमार्गासाठी पुण्यापासून नाशिकपर्यंत सर्व लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, उद्योजक एकवटले असताना नाशिकच्या लोकप्रतिनिधींनीही या विषयात आपला वाटा उचलला आहे. आमदार सत्यजीत तांबे, खासदार अमोल कोल्हे नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्गासाठी वारंवार आवाज उठवित असताना नाशिकच्या आमदार सीमा हिरे आणि खासदार राजाभाऊ वाजे यांनी एकत्रितपणे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन आपले म्हणणे मांडले. नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्गासंदर्भात त्वरीत निर्णय घेण्याचा आग्रह धरतानाच नाशिकहून देशातील इतर महत्वाच्या धार्मिक तीर्थस्थळांसाठी थेट रेल्वेसेवा सुरु करण्याची मागणीही करण्यात आली. नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्गाचा विषय काही महिन्यांपासून चर्चेत आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी तर काही दिवसांपूर्वी हा मार्गच रद्द केल्याचे जाहीर केले होते. परंतु, नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्गासाठी पुन्हा एकदा सर्वजण एकवटले आहेत. नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी पक्षभेद विसरुन यासाठी रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यानुसार शनिवारी सिन्नर तालुका रेल्वे कृती समितीव्दारे नाशिक-पुणे महामार्ग आणि समृध्दी महामार्गावर आंदोलन करण्यात येणार आहे. दुसरीकडे, नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या भाजप



आमदार सीमा हिरे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची नवी दिल्ली येथे भेट घेत नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्ग नाशिक जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रासाठी कसा महत्वपूर्ण आहे ते मांडले. विशेष म्हणजे, यावेळी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे हेही उपस्थित होते. त्यांनीही रेल्वेमंत्र्यांपुढे नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्ग करण्याची मागणी केली. नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्ग झाल्यास नाशिक, सिन्नर, संगमनेर, नारायणगाव, मंचर आणि पुणे या भागातील उद्योग, व्यापार, शिक्षण, पर्यटनास मोठी चालना मिळणार असल्याचे खासदार वाजे यांनी सांगितले. याशिवाय, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील रेल्वे विकासकामांना गती देण्याची मागणीही करण्यात आली. नाशिक रोड रेल्वे स्थानकाचा विकास, सुविधांचा विस्तार, पायाभूत सुविधा आणि कुंभमेळ्याशी संबंधित सर्व रेल्वे कामे वेळेत पूर्ण करण्याची आवश्यकता खासदार वाजे यांनी मांडली. रेल्वेमंत्र्यांशी झालेल्या चर्चेत नाशिकहून पंढरपूरसह देशातील इतर भागाशी धार्मिक पर्यटन वाढण्यासाठी अयोध्या, अजमेर तसेच कटरा (वैष्णोदेवी) या धार्मिक स्थळांसाठी थेट रेल्वेसेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. रेल्वेमंत्र्यांनी खासदार वाजे आणि आमदार हिरे यांनी केलेल्या सर्व मागण्यांविषयी सकारात्मकता दर्शविली. नाशिकहून देशातील महत्वाच्या धार्मिक तीर्थस्थळांसाठी थेट रेल्वेसेवा सुरु झाल्यास त्याचा लाभ नाशिक जिल्ह्यातील धार्मिक पर्यटकांना मिळण्यासह अयोध्या, अजमेर, वैष्णोदेवी या ठिकाणांहून नाशिक, त्र्यंबकेश्वर, शिर्डी या ठिकाणी येऊ इच्छिणाऱ्या भाविकांनाही होणार आहे. त्यामुळे ही एक महत्वपूर्ण मागणी मानली जात आहे. खासदार राजाभाऊ वाजे यांनी काही दिवसांपासून पंचवटी एक्स्प्रेसचा विषय लावून धरला आहे. पंचवटी एक्स्प्रेसला शताब्दी एक्स्प्रेसच्या रेक शेअरिंग व्यवस्थेतून मुक्त करून स्वतंत्र रेक उपलब्ध करून देण्याची मागणी रेल्वेमंत्र्यांकडे खासदार वाजे यांनी पुन्हा एकदा केली.

# संपादकीय...

## देशाला मतदारसंघ पुनर्रचनेची गरज नसुन; मोठ्या प्रमाणात होत असलेल्या भेसळयुक्त पदार्थांवर नियंत्रण आणण्याची गरज...

फक्त राजकारणासाठी व स्वत:च्या स्वार्थासाठी आरोग्याशी खेळ खेळू नये. सर्वप्रथम देशाच्या जनतेच्या भविष्याचा व आरोग्याचा विचार सरकारने करावा. नंतर राजकारणाचा विचार करावा.आरोग्य हिच संपत्ती असे म्हटल्या जाते परंतु यावरच सरकारकडून घणाघाती प्रहार होत आहे.कारण आज देशात सर्वच वस्तूमध्ये व पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याचे दिसून येते आणि याचा सरळ परिणाम देशातील जनतेच्या आरोग्यावर होत आहे या संपूर्ण घटना सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.देशात लोकसभा सदस्य,राज्यसभा सदस्य, विधानसभा सदस्य,विधानपरिषद सदस्य,जिल्हापरिषद सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, महानगरपालिका सदस्य, सरपंच इत्यादी अनेक लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी देशासह राज्यात, ग्रामीण भागात,शहरी भागात आहेत व यांच्या सोबतीला सरकारी यंत्रणा म्हणून मोठ्या प्रशासनाची साथ असतांना व राजकारण्यांचा एवढा मोठा फौजफाटा असतांना देशात मतदारसंघ पुनर्रचनेची गरजच काय? देशात लोकसंख्येच्या प्रमाणात शाळा नाही, विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक नाहीत, लोकसंख्येच्या प्रमाणात हॉस्पिटल नाहीत, लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या नाहीत, लोकसंख्या प्रमाणात नागरी सुविधा नाहीत. परंतु राजकीय पुढाऱ्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आमदार, खासदार,मंत्री पाहिजे ही कसली लोकशाही म्हणावी!याला तर हुकूमशाही म्हणावी लागेल.देशात अनेक ज्वलंत, गंभीर आणि जटील समस्या आहेत व ते प्रत्येक माणसाच्या आरोग्याशी निगडित आहेत.ह्या संपूर्ण गोष्टी सरकारच्या डोळ्यासमोर असतांना सुध्दा सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना फक्त आपले स्वार्थ साधण्यासाठी परिसीमन वाढविण्यावर जास्त भर देत असल्याचे दिसून येते. आज आरोग्याशी निगडित अनेक गंभीर समस्या देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे आहेत.आपण देशातील दुध उत्पादनाचा विचार केला तर दररोज देशात १४ कोटी लिटर दुधाचे संकलन होते.परंतु देशात दूधाचा खप दररोजचा ६४ कोटी लिटर होतो.म्हणजे देशात ५० कोटी लिटर दूध आले कोठून याची सरकारने कधीच चौकशी केली नाही आणि चौकशी करण्याला महत्त्व सुध्दा दिले नाही.परंतू मतदारसंघ पुनर्रचना करण्यासाठी व महिला आरक्षणासाठी सरकारकडून एडीचोटीचा जोर लावण्यात येत असून प्रयत्न सुरू आहे.आज ८० टक्के दूधाचा वापर मुलांच्या आहाराच्या रूपात वापरल्या जातो आणि प्रत्येक आईवडील आपल्या मुलांच्या आरोग्यासाठी दूधाचा वापर करतोच.देशात विकल्या जाणाऱ्या दुधाचा विचार केला तर ८० टक्के दूध बालकांच्या आहारात वापरल्या जाते व २० टक्के दूधाचा वापर सर्वसामान्यांनसाठी केला जातो.यावरून आपण समजू शकतो की, लहान मुलांचे आरोग्य किती धोकादायक श्रेणीमध्ये असावे.दूधातील भेसळ म्हणजे देशातील बालक,आबालवृद्ध व सर्वसामान्यांसाठी स्लोपॉयझनच म्हणावे लागेल.कारण दूधापासून शेकडो पदार्थ तयार होतात आणि एवढे दुध येतेच कोठून असा प्रश्न आज जनतेसमोर उपस्थित होत आहे. राजकीय पुढारी आपल्या स्वार्थासाठी मतदार संघ फेररचना करून राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या तयारीत आहे.

सध्या देशात ५४३ लोकसभा सदस्य आहेत यात फेररचना करून ८५० करण्याच्या तयारीत सत्ताधारी पक्ष आहेत.सरकार महिलांना ५४३ संसद सदस्यामध्ये आरक्षण देण्यास तयार नाही. परंतु मतदार संघ वाढवून महिला आरक्षण देण्यावर जास्त भर देत आहे. याकरीता सरकार फोडाफोडीचे राजकारण करू बहुमताचा आकडा तयार करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी सरकार प्रयत्न करीत आहे.विधेयक पारीत करण्यासाठी सध्याच्या ५४३ खासदारांच्या संख्याबळानुसार दोन तृतीयांश म्हणजे सरकारला लोकसभेत ३६० खासदारांची गरज आहे, सध्या राज्यसभेत २४५ खासदार आहेत बहुमतासाठी राज्यसभेत १६४ सांसद सदस्यांची गरज आहे.परंतु आज देशाला मतदारसंघ पुनर्रचना करण्याची काहीच गरज नाही. कारण देशात पुर्वीपासूनच लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधीं व सरकारचा प्रशासकीय मोठा जखीडा आहे. त्यामुळे राजकारणाचा व प्रशासनाचा एवढा मोठा फौजफाटा असतांना देशात मतदारसंघ पुनर्रचनेची तिळमात्र गरजेचं नाही. जर मतदारसंघाची पुनर्रचना झाली तर देशाच्या १४५ कोटी जनतेवर अरबो रूपयांचा बोजा पडेल व हा संपूर्ण पैसा राजकीय पुढाऱ्यांच्या घशात जाईल.आज भेसळयुक्त पदार्थाने देशाच्या १४५ जनतेचे आरोग्य धोकादायक स्थितीत आले आहे.यामुळे देशाच्या जनतेला अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. आज भेसळयुक्त पदार्थ किंवा वस्तू यांचा जनुकाय खुला बाजार मांडला की असे दिसून येते.आज महाराष्ट्रातील भेसळयुक्त पदार्थ किंवा अन्नधान्य यावर माननीय श्री तुकाराम मुंढे यांनी धाडी टाकून व कठोर कारवाई करून भेसळ करणाऱ्यांची झोप उडविली आहे आणि आज तुकाराम मुंढेमुळे देशातील अनेक राज्य सरकारांना जाग आल्याचे दिसून येते. ह्या घटना अगोदरच सरकारच्या कशा काय लक्षात आल्या नाहीत? असे अनेक प्रश्न आज १४५ कोटी जनतेपुढे उपस्थित होतात.यावरून आपण समजू शकतो की, मुलांचे आरोग्य किती धोकादायक श्रेणीमध्ये असावे याचा अंदाज आपण लावू शकतो.दूधातील भेसळ म्हणजे देशातील मुलं, आबालवृद्ध व सर्वसामान्यांसाठी स्लोपॉयझनच म्हणावे लागेल.रोज सकाळी उठल्यावर आपण जे दूध पितो ते शुद्ध आहे की भेसळयुक्त? याची खातरजमा खरं तर कुणीच करत नाही. मात्र या दुधात भेसळ असण्याची शक्यताच जास्त आहे. कारण देशात उत्पादित होणाऱ्या दुधाच्या चौपट प्रमाणात विक्री केली जाते. आपल्या देशात दररोज १४ कोटी लिटर दुधाचं उत्पादन होतं.परंतू देशात ६४ कोटी लिटर दूध रोज विकलं जात असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. देशात रोज अंदाजे ५० कोटी लिटर भेसळयुक्त दूध विकलं जातं, असा दावा निमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाचे सदस्य मोहनसिंग अहलुवालिया यांनी केला आहे. देशातील ६८.७ टक्के दूध हे अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या निकषांवर नापास झालं आहे. डिसेंबर २०१६ मध्ये सुप्रीम कोर्टाने केंद्राला दूध भेसळीची तातडीने चौकशी करण्याचे आदेश दिला होता. त्यावर सरकारने अर्थमंत्री अरुण जेटलींच्या अध्यक्षतेखाली समिती सुध्दा नेमण्यात आली होती. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या समितीची एकही बैठक झाली नसल्याचे सांगितले जाते आणि आतातर यावर सरकार लक्ष देण्यास नाही ही शोकांतिका म्हणावी लागेल.दुग्धजन्य पदार्थांच्या बाबतीत ऐवढी भेसळ होत आहे की आपण त्याची कल्पना सुद्धा करू शकत नाही.आपण सरासरी विचार केला तर सर्वसाधारण १ लिटर फुल क्रीम दूधापासून खवा साधारणता २०० ग्रॅमच्या जवळपास तयार होतो.त्याचप्रमाणे पनीरचा विचार केला तर साधारणत: १ लिटर फुल क्रीम (म्हशीच्या) दुधापासून साधारणपणे १५० ते २०० ग्रॅम पनीर तयार होते.परंतु यांच्या तुलनेत ५० पटीने खवा व पनीर आपल्याला बाजारात दिसून येते.देशात दररोज ५५ लाख कीलो खवा तयार होतो तर दररोज १ कोटी ५० लाख किलो पनीरचे वापर आणि उत्पादन केले जाते. म्हणजे आपल्याजवळ जेवढे दूध नाही त्याच्या कितीतरी पटीने देशात खवा आणि पनीरचे उत्पादन केल्या जाते याचाच अर्थ असा की, देशात दूध,पनीर,खवा आणि दुधापासून तयार होणारे पदार्थ यामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत आहे आणि सरकारने डोळ्यावर पट्टी बांधून ठेवली आहे.यावरून लक्षात येते की, सरकार सर्वसामान्यांनच्या आहाराकडे व आरोग्याकडे लक्ष न देता परिसीमनवर जास्त भर देत असल्याचे दिसून येते. देशात सर्वच बाबतीत भेसळचे प्रमाण वाढले आहे आणि विद्यार्थ्यांच्या बाबतीत विचार केला तर जंकफूडमुळे त्यांचे आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.यामुळे नवीन-नवीन आजार उदयास येत आहे यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.त्याचप्रमाणे देशात वाढता भ्रष्टाचार,महागाई, बेरोजगारी, पेपर फुटी,जेन-झी चे प्रश्न, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां,शैक्षणिक धोरण, बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली पुरपरिस्थिती अशा गंभीर समस्या देशापुढे असतांना सध्याच देशाला मतदारसंघ पुनर्रचनेची गरज नसून एक सूदृढ,निरोगी आणि भ्रष्टव्यवस्था मुक्त करण्याची गरज आहे.त्यासाठी सरकारने,पक्ष-विपक्षांनी एकत्र येऊन काम करण्याची नितांत गरज आहे.जय हिंद!

# वीज कर्मचाऱ्यांचा एल्गार! महावितरण कार्यालयासमोर द्वारसभा

## प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी; आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**



राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते व अधिकारी कृती समितीच्या वतीने नाशिकरोड येथील महावितरणच्या परिमंडळ कार्यालयासमोर विविध प्रलंबित मागण्यांसाठी जोरदार द्वारसभा घेण्यात आली. महाराष्ट्रातील वीज उद्योगातील १७ कामगार संघटनांच्या संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने वीज कर्मचारी, अभियंते आणि अधिकारी सहभागी झाले. तीनही वीज कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर अद्याप समाधानकारक निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित द्वारसभेत प्रशासनाच्या धोरणांविरोधात कर्मचाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला.

यावेळी किरण जाधव, दीपक गांगुर्डे, सचिन पवार, हर्षद काटे, सुरेश पाचंगे आणि राजू पठाण यांनी मार्गदर्शन केले. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही कृती समितीच्या वतीने देण्यात आला. महेश कदम यांनी सूत्रसंचालन केले, तर सतीश पाटील यांनी आभार मानले.

या आंदोलनात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन, महाराष्ट्र वीज कामगार महासंघ, सबऑर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशन, राज्य वीज कामगार काँग्रेस, राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन, तांत्रिक कामगार युनियन, राज्य राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशन (इंटक), ग्रॅज्युएट इंजिनियर्स असोसिएशन, राष्ट्रवादी वीज कामगार काँग्रेस, राज्य विद्युत ऑपरेटर संघटना, वीज निर्मिती कामगार संघटना, फायनान्स अँड अकाऊंट एम्प्लॉईज युनियन, क्रांतिकारी लाईनस्टाफ सेना, राज्य वीज मंडळ कार्यालयीन कर्मचारी-अधिकारी संघटना आणि युनियन ऑफ केमिस्टसह विविध संघटनांचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस निरीक्षकांच्या बदल्या चार ठिकाणी नव्या नियुक्त्या

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहर पोलीस दलात प्रशासकीय स्तरावर काही पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या असून, सरकारवाडा, गंगापूर तसेच वाहतूक शाखेतील दोन महत्त्वाच्या पदांवर नव्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या बदल्यांमुळे संबंधित पोलीस ठाणे आणि वाहतूक शाखेच्या कामकाजाला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बदल्यांनुसार पोलीस निरीक्षक युवराज पत्की यांची सरकारवाडा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच पोलीस निरीक्षक सुरेश आव्हाड यांच्याकडे गंगापूर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक अशोक शरमाळे यांची वाहतूक शाखा युनिट क्रमांक दोनच्या प्रभारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर पोलीस निरीक्षक संजय पिसे यांच्याकडे सातपूर वाहतूक शाखेच्या प्रभारी अधिकारीपदाची धुरा देण्यात आली आहे.

# नाशिक पूर्व १२३ मतदारसंघातील मतदारांनी ८ व ९ ऑगस्टच्या विशेष शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**



**देशाच्या लोकशाहीला मजबूत करा..**

नाशिक पूर्व १२३ विधानसभा मतदारसंघातील अजूनही ७८ हजार ७४६ मतदारांचे फॉर्म अद्याप डिजिटायझेशन झालेले नाहीत. त्यांनी या ८ व ९ ऑगस्टच्या विशेष शिबिरात भाग घेऊन आपल्या स्वताचे, आपल्या कुटुंबातील, ओळखीचे यांना आवश्यक ते कागदपत्रासह उपस्थित राहून पूर्तता करून आपल्या देशाच्या लोकशाहीला मजबूत करावे.

– कुंदन हिरे, उपजिल्हाधिकारी (महसूल) तथा मतदार नोंदणी अधिकारी

भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत १२३ नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघात मतदार यादीच्या पुनर्निरीक्षणाचे काम सुरु आहे. त्यानुषंगाने या कार्यक्रमांतर्गत मतदारसंघात अद्याप फॉर्म न भरलेले मतदार आढळून आले आहेत. अशा सर्व मतदारांनी ८ व ९ ऑगस्टच्या शिबिराचा लाभ घेण्याचे त्याचबरोबर लोकशाहीला मजबूत करण्याचे आवाहन १२३ नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघाचे उपजिल्हाधिकारी (महसूल) तथा मतदार नोंदणी अधिकारी कुंदन हिरे यांनी केले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनी जिल्हातील सर्व तालुक्यांना हे कामकाज १०० टक्के पूर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

विशेष मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीलओ) यांच्यामार्फत मतदारांचे फॉर्म भरून त्यांचे डिजिटायझेशन करण्याचे काम जिल्ह्यात वेगाने सुरू आहे. गेल्या विधानसभेच्या मतदानासाठी दि. २० नोव्हेंबर २०२४ च्या निवडणूकीच्या वेळी मतदाराने ज्या मतदान केंद्रावर मतदान केलेले होते. त्याचं केंद्रावर मतदान केंद्रीय अधिकारी (बीएलओ) यांना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून या दोन दिवशी मतदार पडताळणी, स्थलांतरित व मृत मतदारांची नोंद, दावा - हरकतीचे निपटारे, डीजिटायझेशन,सेल्फ मापिंग, प्रोजनी मापिंग, माहिती संकलन अश्या विविध कामे केली जाणार आहेत.

नाशिक पूर्व १२३ विधानसभा मतदारसंघात एकूण ४ लाख १६ हजार ४०९ मतदार असून त्यापैकी ३ लाख ३७ हजार ६६३ मतदारांचे फॉर्म आतापर्यंत डिजिटायझेशन करण्यात आले आहेत. मात्र अजूनही ७८ हजार ७४६ मतदारांचे फॉर्म अद्याप डिजिटायझेशन झालेले नाहीत. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी केलेल्या सर्वेक्षणात (अनुपस्थित, स्थलांतरित, मृत) अथवा गृहभेटीच्या दरम्यान अन्य कारणांनी प्राप्त न झालेले मतदार आढळून आले आहेत. या शिबिरांमध्ये संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपस्थित राहून मतदारांचे फॉर्म स्वीकारणार असून, आवश्यक मार्गदर्शनही करणार आहेत. मतदारांनी आपल्या नावाची मतदार यादीतील नोंद अद्ययावत ठेवण्यासाठी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा आणि आवश्यक कागदपत्रांसह फॉर्म भरून प्रक्रिया पूर्ण करावी, असेही आवाहन १२३ नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघाचे उपजिल्हाधिकारी (महसूल) तथा मतदार नोंदणी अधिकारी कुंदन हिरे यांनी केले आहे.

# अलंगुण आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांनी गाजवले तालुकास्तरीय बुद्धिबळ

**सुरगाणा । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभाग व नाशिक जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रगती माध्यमिक विद्यालय, उंबरपाडा येथे मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्ष वयोगटातील तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. चुरशीच्या सामन्यांमध्ये बुद्धिमत्तेची कसोटी पाहायला मिळाली. या क्रीडा स्पर्धेत अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, अलंगुण ता. सुरगाणा, जि. नाशिक येथील आठ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट बुद्धिबळ खेळाचे प्रदर्शन केले. सातत्यपूर्ण खेळी आणि संयमाच्या जोरावर या शाळेतील आठही विद्यार्थ्यांची नाशिक जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तालुक्यासाठी ही अभिमानास्पद बाब आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जे. पी. गावीत, संचालक मंडळ, समन्वयक, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी तालुक्याचे नाव उज्ज्वल केल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. आता जिल्हास्तरावर देखील ते असेच घवघवीत यश मिळवतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# तळेगाव दाभाडे येथे भाजीपाला व रोपवाटिका व्यवस्थापन प्रशिक्षण संपन्न

**देवळा । प्रतिनिधी**




कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा नाशिक आणि महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भाजीपाला व रोपवाटिका व्यवस्थापन या विषयावर निवासी प्रशिक्षण नुकतेच राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था NIPHT, तळेगाव दाभाडे येथे पार पडले. या प्रशिक्षणात नाशिक जिल्ह्यातील ४० प्रगतिशील शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये देवळा तालुक्यातील ५ शेतकऱ्यांचा समावेश होता.

**तज्ज्ञांचे मार्गदर्शन**

प्रशिक्षणाचे उद्घाटन मिलिंद आकरे संचालक NIPHT, अभिमन्यू काशीद प्रकल्प संचालक आत्मा नाशिक आणि दिगंबर साबळे विभाग प्रमुख महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्या उपस्थितीत झाले. प्रवीण ननावरे संस्थापक ग्रीन गोल्ड हायटेक रोपवाटिका मंचर यांनी रोपवाटिका अर्थशास्त्र आणि मार्केटिंगबाबत माहिती दिली. अमोल भाऊ NIPHT यांनी रंगीत ढोबळी मिरची, काकडी, लेट्यूस, आईसबर्ग या एक्झॉटिक भाज्यांच्या आधुनिक लागवडीचे तंत्र सांगितले. संपत यादव यांनी कीड-रोग व्यवस्थापन तर रविंद्र देशमुख यांनी संरक्षित वातावरणातील रोपवाटिका आणि कलम तंत्रज्ञान समजावून सांगितले. डॉ. दिलीप वैरागडे यांनी रोपवाटिका व्यवसायातील वित्तीय नियोजन आणि उद्योजकतेच्या संधींवर प्रकाश टाकला.

**प्रात्यक्षिक भेटी**

हेमंत जगताप यांच्या नियोजनातून प्रशिक्षणार्थींना फ्लोरिकल्चर पार्क तळेगाव, ग्रीन गोल्ड हायटेक रोपवाटिका मंचर, कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव आणि राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन केंद्र राजगुरुनगर येथे नेण्यात आले. राजगुरुनगर येथे डॉ. संकेत मोरे यांनी मल्चिंग पेपरवर कांदा लागवडीचे प्रात्यक्षिक दाखवून पाणी बचत आणि उत्पादनवाढीचे फायदे पटवून दिले. आत्मा नाशिकचे बीटीएम महेश देवरे यांनी प्रशिक्षणाचे समन्वय पाहिले. आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. हे प्रशिक्षण शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरल्याचे मत सहभागींनी नोंदवले.

पान १ वरून...

## गोंदे फाट्यावरील हॉटेलवर छापा १६ किलो आफू जप्त

आला. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत २ लाख ५९ हजार ७०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीने चौकशीत हा साठा हॉटेल मालक गोमाराम चौधरी, रा. गोंदे यांच्या आदेशावरून विक्रीसाठी बाळगल्याचे कबूल केले आहे. आरोपीविरुद्ध वावी पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क) व २२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईबाबत नाशिक ग्रामीण पोलीस दलाने सांगितले की, जिल्ह्यात अवैध व्यवसाय व अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहतील. याप्रकरणाचा तपास वावी पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

## निदाला लपविल्याप्रकरणी मतीन पटेलला...

दाखल आहेत. यामध्ये प्रमुख संशयित आरोपी म्हणून निदा खान हिचे नाव घेतले जाते. ती पोलिसांच्या हाती लगात नसताना तिने छत्रपती संभाजी नगर येथील एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेल याच्या मदतीने आश्रय घेतला होता. ज्या घरात निदा आश्रयास होती, त्या घराचे मालक हनिफ खान आणि पटेल यांची विशेष तपास पथकाने जवळपास सात ते आठ तास चौकशी केली. चौकशीअंती उभयतांचे भ्रमणध्वनी जप्त करण्यात आले. एसआयटी चौकशीत नगरसेवक पटेलने निदाला आश्रय दिल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, मतीन यास न्यायालयाने समन्स बजावले होते. त्यानुसार ३१ जुलै रोजी त्याने न्यायालयात हजर राहणे आवश्यक असताना तो गैरहजर राहिल्याने त्याच्या विरोधात अजामीनपात्र आदेश काढण्यात आले. आदेशाची अंमलबजावणी करत नाशिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी रात्री त्याला छत्रपती संभाजी नगर येथुन ताब्यात घेत नाशिकमध्ये आणले. शुक्रवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश केदार जोगळेकर यांच्या न्यायालयात पटेल याच्या वतीने ॲड. प्रतीक ताजनपुरे यांनी युक्तीवाद केला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर पटेल यास १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

दैनिक बोल नाशिक
प्रकाशक व मुद्रक कल्पेश मधुकर बिरारी यांनी मालक श्री. प्रशांत सुभाष हिरे यांच्या वतीने हे पत्र कुलश्री प्रिंटर्स १, श्रीकुल अपार्टमेंट, गंगापूर रोड, पंपिंग स्टेशन, नासिक(महाराष्ट्र) ४२२०१३ येथे मुद्रित व ७८६, सुजाता बंगला, इंगळे नगर, जेलरोड, नाशिकरोड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी मालक, संपादक, प्रकाशक अगर मुद्रक सहमत असतीलच असे नाही. मालक श्री. प्रशांत सुभाष हिरे व श्री. मायकल खरात संपादक (महाराष्ट्र) (पी.आर.बी. कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार) मो.नं. 9359261192 / 9145110443, सर्व अधिकार सुरक्षित. PRGI No. MHBIL/25/-2129. Email- boalnashik2025@gmail.com

# कत्तलीच्या वाटेवरचे पाच गोवंश वाचले; दोघांच्या मुसक्या आवळल्या!

## गुन्हेशाखा युनिट-२चा द्वारका चौकात सापळा; महिंद्रा पिकअपसह ६ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नाशिक । प्रतिनिधी**

कत्तलीच्या उद्देशाने गोवंश जनावरांची निर्दयीपणे वाहतूक करणाऱ्या दोघांना गुन्हेशाखा युनिट-२च्या पथकाने द्वारका चौक परिसरात सापळा रचून जेरबंद केले. महिंद्रा पिकअप वाहनातून दाटीवाटीने, दोरीने बांधून नेण्यात येणाऱ्या पाच गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली. या कारवाईत वाहन, मोबाईल फोन आणि पाच गोवंश जनावरे असा एकूण ६ लाख ५३ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदिप मिटके यांनी नाशिक शहरात विनापरवाना गोवंश जनावरांची वाहतूक व कत्तलीविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना गुन्हेशाखेला दिल्या आहेत. त्यानुसार गुन्हेशाखा युनिट-२चे पथक संशयितांचा शोध घेत असताना पोलीस हवालदार अतुल पाटील व मनोज परदेशी यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली. मुंबई-आग्रा महामार्गावरील द्वारका चौकात उतरणाऱ्या उड्डाणपुलाच्या रॅम्पवरून एमएच-१५-सीके-६४०५ क्रमांकाच्या महिंद्रा पिकअपमधून गोवंश जनावरे



कत्तलीसाठी बागवानपुरा येथे नेण्यात येणार असल्याची माहिती मिळताच ती गुन्हेशाखा युनिट-२चे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक हेमंत तोडकर यांना देण्यात आली.

माहितीची खातरजमा करून कारवाईचे आदेश मिळताच पथकाने द्वारका चौक परिसरात सापळा रचला. काही वेळातच संशयित महिंद्रा पिकअप तेथे येताच पोलिसांनी वाहन अडवून झडती घेतली. वाहनात पाच गोवंश जनावरे अतिशय दाटीवाटीने आणि निर्दयीपणे बांधून ठेवण्यात आली होती. जनावरांना हालचाल करता येणार नाही अशा पद्धतीने जाड दोरीने बांधण्यात आले होते. तसेच चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या प्रकरणी पोलिसांनी रिझवान नुरआलम शेख (२७, रा. चौक मंडई, बिरबल आखाडा, भद्रकाली, नाशिक) आणि रेहान हैदर बेग (२९, रा. चौक मंडई, बिरबल आखाडा, भद्रकाली, नाशिक) या दोघांना ताब्यात घेतले. याप्रकरणी गुन्हेशाखा युनिट-२चे पोलीस हवालदार अतुल पाटील यांनी मुंबईनाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ मधील कलम ५(अ), ५(ब), ९ तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम १९६० मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कारवाईसाठी मुंबईनाका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई गुन्हेशाखा युनिट-२चे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक हेमंत तोडकर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक डॉ. समाधान हिरे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक बाळू शेळके, सहायक पोलीस उपनिरीक्षक शंकर काळे, पोलीस हवालदार सुनील आहेर, प्रकाश महाजन, अतुल पाटील, वाल्मीक चव्हाण व मनोज परदेशी यांच्या पथकाने केली.



# पेठ शहरात पाणीटंचाई आणि घाणीचे साम्राज्य, विशेष महासभेची मागणी

**पेठ । प्रतिनिधी**

पेठ शहरात गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून ऐन पावसाळ्यातही नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत पेठ नगरपंचायतीच्या वतीने शहरातील पाणीटंचाई व स्वच्छतेच्या गंभीर प्रश्नावर चर्चा करण्यासाठी विशेष महासभा तातडीने बोलावण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, पावसाळासुरुहोण्यापूर्वीशहरातील नालेसफाई करणे आवश्यक होते, मात्र ती न झाल्याने सर्वत्र पाणी साचत आहे. तसेच शहरात सुरु असलेली भूमिगत गटारीची कामे वेळेत पूर्ण न झाल्याने रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. अपूर्ण अवस्थेत असलेल्या गटारींमध्ये प्लॅस्टीक कचरा साचल्याने त्या तुंबल्या आहेत. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असून डास आणि माशांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने वेळेत कामे न केल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे वरील सर्व प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून तातडीचे उपाययोजना करण्यासाठी नगरपंचायतीची विशेष महासभा घेण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शिक्षक-पालक संवाद महत्त्वाचा : विजय पगार

**देवळा । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिक्षक-पालक संवाद महत्त्वाचा असल्याचे सांगत त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधावा असे आवाहन 'मविप्र'चे देवळा तालुका संचालक विजय पगार यांनी केले.

देवळा येथील अभिनव व जनता विद्यालयात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी उपशिक्षक सुरेश आहेर यांनी आलेल्या मान्यवरांचे व पालकांचे स्वागत केले. विद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

मुख्याध्यापक मनीष बोरसे यांनी शालेय कामकाज व शाळेत राबविल्या जात असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांविषयी माहिती प्रास्ताविकातुन मांडली. यावेळी उपस्थित पालकांमधून शाळा व्यवस्थापन समिती, माता-पालक संघ व विशाखा



समिती यांचे गठन करण्यात आले.

यावेळी पालकांमधून आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगती बाबत अडचणी, शंका उपस्थित केल्या. त्यांचे निरसन मुख्याध्यापक मनीष बोरसे यांनी केले. यावेळी पालक विलास जोशी यांनी शाळेला पालखी व विठ्ठलाची मूर्ती भेट दिली.

याप्रसंगी सेवानिवृत्त प्राध्यापक भास्कर पवार , शालेय समिती सदस्य हिरामण गांगुर्डे ,गुंजाळनगरचे पोलीस पाटील योगेश गुंजाळ,अशोक भदाणे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक फुला सूर्यवंशी, प्रा.नारायण पवार,रघुनाथ पगार,महेंद्र आहेर,शरद आहेर,चेतन गुंजाळ,नारायण पवार,आदिसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन उपशिक्षिका पुनम पाटील यांनी केले. तर आभार ज्ञानेश्वर आहेर यांनी मानले. पालक मेळावा यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मसापच्या 'संवाद सृजनाशी' उपक्रमात लेखक गणेश चंद्रमोरे शनिवारी करणार संवाद

**नाशिकरोड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक रोड शाखेतर्फे आयोजित 'संवाद सृजनाशी' या उपक्रमांतर्गत नाशिकचे ज्येष्ठ लेखक आणि निवृत्त केंद्र प्रमुख गणेश चंद्रमोरे आपला साहित्य प्रवास रसिकांसमोर उलगडणार आहेत. हा कार्यक्रम शनिवार दिनांक ८ रोजी सायंकाळी ६ वाजता नाशिक रोड येथील ऋतुरंग भवन येथे होणार आहे. यावेळी चंद्रमोरे '२९ पुष्प' या संकल्पनेतून आपल्या लेखन, अनुभव आणि विचारांची मांडणी



करणार आहेत.

आंबेडकरी चळवळीतील सक्रिय सहभाग आणि शालेय शिक्षण पद्धतीवरील अचूक निरीक्षण ही चंद्रमोरे यांची प्रमुख बलस्थाने आहेत. शालेय शिक्षणातील त्रुटी आणि त्यावरील उपाय मांडणारे त्यांचे 'शिक्षणातील माझा सहभाग' हे पुस्तक साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केले आहे. या माहितीची घोषणा शाखेचे अध्यक्ष उन्मेष गायधनी यांनी केली.

कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन उपाध्यक्ष रवींद्र मालुंजकर, प्रमुख कार्यवाह शिवाजी म्हस्के, कोषाध्यक्ष दशरथ लोखंडे, अलका अमृतकर, कांचन पवार, सुमन हिरे, मानसी घमंडी, रामचंद्र शिंदे, योगेश कापडणीस, डॉ. सुधीर ठोसर, गणपतराव मुठाळ आदींनी केले आहे.

# निफाड नगरपंचायतीत व्यसनमुक्तीची शपथ

### नशामुक्त युवा-विकसित भारत संकल्पाबाबत बैठक

**निफाड । प्रतिनिधी**

नशामुक्त युवा विकसित भारत संकल्प अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निफाड नगरपंचायत कार्यालयात नियोजन बैठक झाली. बैठकीस शहरातील शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पोलीस निरीक्षक, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत अभियानाची उद्दिष्टे, नशामुक्तीबाबत व्यापक जनजागृती, विद्यार्थी व नागरिकांचा सहभाग आणि शाळा, पोलीस प्रशासन व नगरपंचायतीच्या समन्वयावर चर्चा झाली. या अभियानांतर्गत निफाड शहरातून जनजागृती रॅली, व्याख्याने, स्पर्धा, स्वच्छता मोहीम वृक्षारोपण व नशामुक्तीविषयक प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले. अभियानाचा भाग म्हणून निफाड नगरपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १, सरस्वती विद्यालय आणि निफाड इंग्लिश स्कूल येथे व्यसनमुक्ती शपथविधी कार्यक्रम उत्साहात झाला. विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अमली पदार्थांपासून दूर राहून निरोगी व सशक्त समाज घडवण्याची सामूहिक शपथ घेतली. नगरपंचायतीच्या या उपक्रमास मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अभियान यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. व्यंकट गिते विराजमान

### संशोधन, गुणवत्ता आणि विद्यार्थी समस्या निवारणाला प्राधान्य

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून डॉ. व्यंकट गिते यांचा पदग्रहण समारंभ विद्यापीठात उत्साहात झाला. यावेळी कुलगुरु डॉ. गिते यांनी विद्यापीठासाठी कुलगुरु म्हणून आपण काय काय करणार आहोत, त्यासंदर्भातील मनोगत मांडले. आरोग्य शिक्षणात संशोधनावर आधारित उपक्रम, पारदर्शक प्रशासकीय कामकाज व विद्यार्थी केंद्री कामांना सर्वाधिक प्राधान्य देण्यासह विद्यापीठात आता सिंगल विन्डो सिस्टम प्रणाली लागू करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

व्यासपीठावर कुलगुरु डॉ. व्यंकट गिते समवेत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सचिन मुंबरे, डॉ. मिलिंद आवारे, डॉ. यशवंत पाटील, डॉ. अजित फुंदे, डॉ. श्रीचक्रधर मुंघल, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, वित्त व लेखाधिकारी बोधिकिरण सोनकांबळे, डॉ. देवेंद्र पाटील, डॉ. अनिता गिते आदी उपस्थित होते. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांनी सांगितले की, विद्यापीठात



समाजोपयोगी संशोधन होणे गरजेचे आहे त्यासाठी संशोधक विद्यार्थी यांना निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय मानांकनात पहिल्या शंभर विद्यापीठाच्या यादीत स्थान मिळावे यासाठी विविध संशोधन, समाजोपयोगी आरोग्य जनजागृती उपक्रम व 'नॅक' च्या धर्तीवर गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी नमूद केले. विद्यापीठात सिंगल विन्डो सिस्टम प्रणाली लागू करण्यात येईल ज्याव्दारा विद्यार्थी आपल्या समस्या मांडू शकतील. व्ही.सी. पोर्टल कार्यान्वीत करुन त्याव्दारा ऑनलाईन तक्रारींचा निपटारा करण्यात येईल. कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करण्यात येईल. कॉन्फीडन्सी बेस्ड मेडिकल एज्युकेशनवर अधिक भर देण्यात येईल. आय.आय.टी., इस्त्रो, स्पोर्ट इंस्टिट्युट ऑफ सायन्स सारख्या नामांकित संस्थांशी करार करुन आरोग्य शिक्षण प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी भर देण्यात येईल.

यावेळी कुलगुरु यांच्या मातोश्री शाहुबाई अर्जुनराव गिते यांचा सन्मान करण्यात आला. कुलगुरु यांच्या पत्नी डॉ. अनिता गिते, बंधू भास्कर गिते यांचा विद्यापीठाकडून सत्कार करण्यात आला. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांना ज्ञानदान करणारे त्यांचे शिक्षक व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. डॉ. पुरुषोत्तम दराख, डॉ. श्रीराम कंडी, डॉ. अनुराधा कंडी, डॉ. जे.एस. कंडी, डॉ. मलीक, डॉ. गौरांग शहा, डॉ. पळनीटकर, डॉ. एन.डी. कुलकर्णी, डॉ. पंकज माहेश्वरी, डॉ. प्रविण कुमार वसाडीकर, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. अजय बोराळकर, डॉ. किरण पाटोळे, डॉ. स्वप्नाली कदम, डॉ. गणेश जाधव, डॉ. सचिन देवरे, डॉ. अनिल सानप, डॉ. अशोक थोरात आदी गुरुजनांचा कुलगुरु यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी कुलगुरुंचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी केले.

# ३९ वर्षांनंतर बी.एस्सी. १९८७ बॅचचा स्नेहमेळावा; गुरुजनांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार

**देवळा । प्रतिनिधी**

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष १९८७च्याबी.एस्सी.(विज्ञानशाखा) माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच महाविद्यालयाच्या परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तब्बल चार दशकांनंतर एकत्र आलेल्या ७६ माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी त्या काळातील प्रा. डी. आर. महाजन, प्रा. ए. आर. पवार, डॉ. बी. एम. देवरे, डॉ. व्ही. डी. सोनवणे, प्रा. शांताराम गुंजाळ, प्रा. पगार आदी विषय शिक्षकांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना प्राध्यापकांनी विद्यार्थीदशेतील आठवणींना उजाळा देत जीवनात प्रामाणिकपणा, परिश्रम, सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

माजी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य प्रा. अनिल पाटील यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा मांडला. महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही माजी विद्यार्थ्यांचा सन्मान केला. राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) कॅडेट्सनी शिस्तबद्ध पद्धतीने स्वागत करून कार्यक्रमाला विशेष दिमाख प्राप्त करून दिला. याप्रसंगी सर्व माजी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना रविंद्र शिरसाट लिखित योग पुस्तिकेचे वाटप करण्यात आलं. सदर स्नेहमेळाव्याचे नियोजन डॉ. डी. के. आहेर, डॉ. सतीश ठाकरे, प्रवीण येवला ,प्रा. रवींद्र शिरसाट यांनी केले. कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत परस्परांशी स्नेहसंवाद साधला. भविष्यातही अशा स्वरूपाचे स्नेहमेळावे नियमितपणे आयोजित करण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी व्यक्त केला. कार्यक्रमामुळे महाविद्यालय परिसरात जुन्या आठवणींना उजाळा मिळाला असून, गुरु-शिष्य नात्याचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी उपस्थितांना लाभली.

# फायरींगनंतर पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राईक'; दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या!

## नाशिकरोड रेल्वे स्टेशन परिसरातील पिस्तुलाच्या धाकाने लूटप्रकरण; गुन्हेशोध पथक व गुन्हे शाखा युनिट-२ची संयुक्त कारवाई

**नाशिकरोड । प्रतिनिधी**

नाशिकरोड रेल्वे स्टेशन परिसरात पिस्तुलाचा धाक दाखवून १७ हजार रुपये बळजबरीने लुटल्याप्रकरणी तसेच उपनगर पोलीस ठाणे हद्दीत फायरींग केल्याच्या गंभीर गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपींच्या मुसक्या आवळण्यात नाशिकरोड पोलिसांना यश आले आहे. नाशिकरोड गुन्हेशोध पथक आणि गुन्हे शाखा युनिट-२ने संयुक्तपणे कारवाई करत रोहित पवार आणि आयुष शिंदे या दोघांना ताब्यात घेतले.

दि. २९ जुलै रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास नाशिकरोड रेल्वे स्टेशनसमोरील बसस्थानकात अफरोज अख्तर खान याला आरोपींनी पिस्तुलाचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर त्याच्या खिशातील सुमारे १७ हजार रुपये बळजबरीने काढून घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याच घटनेच्या अनुषंगाने उपनगर पोलीस ठाण्यातही गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल झाला होता.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, परिमंडळ-२चे पोलीस उपआयुक्त किशोर काळे आणि नाशिकरोड विभागाच्या सहायक पोलीस आयुक्त अव्दिता शिंदे यांनी आरोपींचा तातडीने शोध घेऊन अटक करण्याचे आदेश दिले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिकरोड गुन्हेशोध पथकाने आरोपींच्या शोधासाठी ओझर, दिंडोरी, तळेगाव-वणी, मनमाड, कन्नड, राहाता आणि शिर्डी परिसरात शोधमोहीम राबवली. या तपासादरम्यान शिर्डी येथे रोहित पवार याचा ठावठिकाणा निष्पन्न झाला. पथकाने शिताफीने त्याला ताब्यात घेतले. दरम्यान, गुन्हे शाखा युनिट-२चे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक हेमंत तोडकर आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आयुष शिंदे याचा शोध सुरू केला. पोलिसांच्या नजरेतून बचावण्यासाठी वेश बदलून जेलरोड परिसरात वावरणाऱ्या आयुष शिंदेची माहिती मिळताच गुन्हेशोध पथकाने सापळा रचला. दि. ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी दसक पेट्रोलपंप येथे गुन्ह्यात वापरलेल्या ठ१५ मोटारसायकल क्रमांक एमएच १५ जेएफ ८५१८ मध्ये पेट्रोल भरत असताना त्याला ताब्यात घेण्यात आले.

गावठी कट्ट्याने हवेत फायरींग; व्हिडिओमुळे पोलिसांच्या हाती नवा पुरावा

तपासादरम्यान आरोपी भूषण गोसावी याच्याशी संबंधित आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. भूषण गोसावी याने विनापरवाना गावठी कट्टा बाळगून तो कोमल गायकवाड हिला दिला आणि तिच्याकडून हवेत फायरींग करून घेतल्याचे तसेच या प्रकाराची मोबाईलवर चित्रफीत तयार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियमासह महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला असून कोमल गायकवाड हिला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार विशाल पाटील करीत आहेत. या कारवाईत नाशिकरोड गुन्हेशोध पथक आणि गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाने तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि प्रत्यक्ष शोधमोहीम यांचा प्रभावी वापर करत आरोपींपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस आयुक्त संदिप कर्णिक आणि पोलीस उपआयुक्त किशोर काळे यांनी नाशिकरोड गुन्हेशोध पथकाचे कौतुक केले.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे, पोलीस निरीक्षक अतुल चौधरी, पोलीस निरीक्षक घनदाट, सहायक पोलीस निरीक्षक हेमंत तोडकर, सहायक पोलीस निरीक्षक प्रविण सूर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक सुनील बिडकर, पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र माळी तसेच गुन्हेशोध पथक व गुन्हे शाखा युनिट-२च्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केली.

## महत्वाचे...

### लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती

**सिन्नर |** तालुक्यातील सोमठाणे येथे लोकशाहीर व साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. जिल्हा परिषद माजी सदस्या सीमंतिनी कोकाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलीसपाटील दीपाली धोक्रट, तसेच विविध क्षेत्रांतील ज्येष्ठ मान्यवरांचा समाजबांधवांतर्फे सत्कार करण्यात आला. सीमंतिनी कोकाटे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा आढावा घेतला. यावेळी समाजबांधवांतर्फे कचरू कोकाटे यांनी परिसरात ग्रंथालय उभारण्याची मागणी केली. या मागणीबाबत आपण सकारात्मक असून, लवकरच आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात येईल, असे आश्वासन सीमंतिनी कोकाटे यांनी दिले. विविध समस्या, अपेक्षा आणि विकासासंदर्भातील मागण्या जाणून घेत त्या संबंधित लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवून त्यावर पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

### चेक बाउन्सप्रकरणी व्यापाऱ्यास कारावास; ४.३१ लाखांचा दंड

**निफाड |** द्राक्ष खरेदीच्या व्यवहारातील चेक बाउन्स प्रकरणात पिंपळगाव बसवंत येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायालयाने आरोपी व्यापाऱ्यास ६ महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली असून, ४,३१,११६ रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसेच, दंडाची ही संपूर्ण रक्कम तक्रारदार शेतकऱ्यास भरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. याप्रकरणी कसबे-सुकणे येथील शेतकरी रामकृष्ण रंगनाथ शेवकर यांनी आदित्य अ‍ॅग्रो एक्स्पोर्टसचे चालक संतोष बबन गवळी यांच्याविरुद्ध निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अ‍ॅक्टच्या कलम १३८ अंतर्गत तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, २०१९ मध्ये आरोपीने तक्रारदाराकडून ५७.१७क्विंटल द्राक्षे खरेदी केली होती. त्यापोटी २,९७,२८४ रकमेचा धनादेश (चेक) दिला होता. मात्र, हा धनादेश बँकेत सादर केला असता खात्यात पुरेशी शिल्लक नसल्याने तो अनादरित (बाऊन्स) झाला. त्यानंतर कायदेशीर नोटीस पाठवूनही रक्कम अदा न केल्याने शेतकरी शेवकर यांनी अ‍ॅड. केशव पी. खैरे यांच्यामार्फत न्यायालयात खटला दाखल केला. सुनावणीदरम्यान आरोपीने 'धनादेश हा केवळ सिक्युरिटी म्हणून दिला होता' असा बचाव मांडला. मात्र, धनादेशावर आरोपीचीच सही असल्याचे निर्विवाद सिद्ध झाले होते. तसेच, देय रक्कम अदा केल्याचा कोणताही ठोस पुरावा आरोपीला सादर करता आला नाही. त्यामुळे न्यायालयाने आरोपीचा बचाव फेटाळून लावला. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्री. ए. जे. पाटील यांनी आरोपीस दोषी ठरवत ६ महिन्यांचा साधा कारावास, ४,३१,११६ दंड, अशी शिक्षा सुनावली. या प्रकरणात तक्रारदारातर्फे अ‍ॅड. के. पी. खैरे, तर आरोपीतर्फे अ‍ॅड. टी. पी. घुमरे यांनी कामकाज पाहिले.



### नाशिकच्या प्रा. सोनल मोरे यांच्या प्रेग्नन्सी सपोर्ट बेल्टला मिळाले डिझाईन पेटंट

**नाशिकरोड |** गर्भवती महिलांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या एका अभिनव उत्पादनाला मोठे यश मिळाले आहे. येथील डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतनच्या प्रा. सोनल मोरे यांनी विकसित केलेल्या वेअरेबल प्रेगनन्सी सपोर्ट अँड मॉनिटरिंग बेल्ट या उत्पादनाला भारत सरकारकडून डिझाईन पेटंट प्राप्त झाले आहे.

गर्भावस्थेत महिलांना पाठदुखीपासून आराम देण्यासाठी आधार देणाऱ्या आणि त्याचबरोबर आरोग्याचे निरीक्षण करू शकणाऱ्या या बेल्टच्या वैशिष्ट्यपूर्ण आकार, रचना आणि उपयुक्ततेमुळे पेटंट मंजूर करण्यात आले आहे. या बेल्टमुळे गर्भवती महिलांना दैनंदिन काम करताना अधिक आराम आणि सुरक्षितता मिळणार आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेच्या प्राचार्या डॉ. श्रद्धा देशपांडे यांच्या हस्ते प्रा. सोनल मोरे यांचा सत्कार करण्यात आला. या संशोधन प्रकल्पात उत्कर्ष मांडगे, डॉ. शीतल पाटील, डॉ. अनुराधा सिंह, शौनक मांडे, सुषमा पाटील, प्रांजली पाटील, आशिष जाधव, प्राजक्ता महाजन, गौरजा वाणी यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. या पेटंटमुळे नाशिकच्या तंत्रशिक्षण क्षेत्राला नवी ओळख मिळाली असून, महिला-केंद्रित तंत्रज्ञानाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# नाशिकरोडचा रस्ता झाला भुयार

## प्रशासनाची दुरुस्ती ठरली तात्पुरती

**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिक शहरामध्ये सध्या सुरु असलेल्या रस्त्यांच्या विकासकामांमुळे नाशिककर हैराण झाले असून या खड्ड्यांमुळे नाशिककर अपघातांना बळी पडत आहे. शहरातील नाशिकरोड परिसरात देखील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. नाशिक रोड रेल्वे स्थानकाबाहेरील बसस्थानकाजवळ असलेल्या पोलीस चौकीसमोरील रस्त्यावर रस्त्यांच्या कामामुळे भुयारासारखा मोठा खड्डा पडल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, महापालिकेने हा खड्डा शुक्रवारी सकाळीच बुजविल्याचा दावा केला असतानाही काही तासांतच त्याच ठिकाणी एक रिक्षा अडकली.



**पाइपलाइनच्या कामानंतर रस्त्यांची दुर्दशा**

गेल्या काही दिवसांपासून नाशिकरोड परिसरातील प्रमुख रस्त्यांवर पाइपलाइन उभारणीची कामे सुरू होती. या कामांसाठी अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आले.

काम पूर्ण झाल्यानंतर हे रस्ते कायमस्वरूपी दुरुस्त करण्याऐवजी तात्पुरती मलमपट्टी करून बुजविण्यात आल्याचा आरोप परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे या ठिकाणी टाकलेली माती आणि वाळू वाहून गेली. परिणामी पुन्हा मोठमोठे खड्डे पडले असून अनेक रस्ते वाहतुकीसाठी धोकादायक बनले आहेत.

**कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी**

नाशिकरोड परिसरात जवळपास प्रत्येक प्रमुख रस्त्यावर खड्डे पडले असून नागरिकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता खोदलेले रस्ते अभियांत्रिकी निकषांनुसार कायमस्वरूपी दुरुस्त करावेत, तसेच संबंधित ठेकेदारांवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी केली आहे.

**दोनदा खोदलेल्या रस्त्यावरच पडला भुयारासारखा खड्डा**

नाशिकरोड बसस्थानकासमोरील पोलीस चौकीसमोरील रस्ता पाइपलाइन आणि चेंबरच्या कामासाठी दोन वेळा खोदण्यात आला होता. काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता बुजविण्यात आला; मात्र योग्य पद्धतीने खड्डा न बुजवल्याने पावसामुळे माती वाहून गेली आणि त्याच ठिकाणी भुयारासारखा मोठा खड्डा निर्माण झाला. या मार्गावरून दररोज बसस्थानक, रेल्वे स्थानक आणि शहराच्या विविध भागांकडे जाणाऱ्या हजारो प्रवाशांची तसेच सिटी लिंक बस, रिक्षा आणि इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. त्यामुळे हा खड्डा अपघाताला निमंत्रण देत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**खड्डा बुजवला... पण काही तासांतच रिक्षा अडकली**

दरम्यान, नाशिक महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी गुरुवारी सकाळी संबंधित खड्डा बुजविण्याचे काम केले. मात्र, काही वेळातच त्याच ठिकाणी एक रिक्षा अडकली. रिक्षा चालक आणि त्याच्या सहकाऱ्यांना मोठ्या प्रयत्नांनी रिक्षा खड्ड्यातून बाहेर काढावी लागली. या घटनेमुळे महापालिकेच्या दुरुस्तीच्या कामाच्या गुणवत्तेवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# देवळा-मालेगाव रोडवर भीषण अपघात

## कारच्या धडकेत २ जण जागीच ठार, चालक फरार

**देवळा | प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळगाव (वा.) शिवारात शुक्रवारी सायंकाळी दुचाकी आणि इर्टिगा कार यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दोन जण जागीच ठार झाले. अपघातानंतर कारचालकाने कार घटनास्थळी सोडून पळ काढल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास देवळा-मालेगाव रोडवरील पिंपळगाव (वा.) शिवारात घडली.




दहिवड, धोबीघाट येथील देविदास पांडुरंग ठाकरे वय ,२६ आणि कैलास उर्फ तात्या पुंडलिक देवरे वय ५५ हे दोघे चक-४१ इड-३१५२ क्रमांकाच्या मोटारसायकलवरून दहिवडकडून देवळ्याकडे येत होते. त्याचवेळी समोरून देवळ्याकडून मालेगावकडे जाणाऱ्या चक-०४ कग-१२८९ क्रमांकाच्या इर्टिगा कारने त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील दोघेही गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले. अपघातानंतर कारचालकाने कार जागीच सोडून पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच देवळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी देवळा ग्रामीण रुग्णालयात पाठवले आहेत. या प्रकरणी देवळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. फरार कारचालकाचा पोलीस शोध घेत आहेत. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पाहूचीबारीची शाळा धोक्यात!

## २६५ विद्यार्थ्यांचे भवितव्य जीर्ण इमारतीच्या छताखाली

**बाऱ्हे | प्रतिनिधी**

पेठ तालुक्यातील पाहूचीबारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत जीर्ण होऊन धोकादायक अवस्थेत पोहोचली आहे. भिंतींना मोठमोठे तडे गेले आहेत, काही ठिकाणी पाया खचला असून छत गळत आहे. या इमारतीत इयत्ता पहिली ते सातवीचे २६५ विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विरमाळ, जाहूले, गांडोळे, चिकाडी, टेटमाळ, दाबदरी, घाटाळबारी, करंजखेड, तोरणमाळ, डिकसळ या परिसरातील १० हून अधिक गावांमधून सुमारे ५ किलोमीटरवरून विद्यार्थी या शाळेत येतात. शाळेचा शैक्षणिक दर्जा चांगला असल्याने पटसंख्या मोठी आहे. इमारत धोकादायक झाल्याने सध्या विद्यार्थ्यांची तात्पुरती व्यवस्था ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी आणि एका जुन्या घरात करण्यात आली आहे. परंतु ही व्यवस्था





कोंदट असून पावसाळ्यात अधिकच अडचणीची ठरत आहे. त्यामुळे शैक्षणिक नुकसानासह विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी गेल्या दोन वर्षांपासून शिक्षण विभागाकडे लेखी पत्रव्यवहार आणि प्रत्यक्ष भेटी देऊन इमारतीच्या धोकादायक स्थितीबाबत माहिती दिली आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. पावसाळ्यात गळती आणि परिसरात जाणवणाऱ्या सौम्य भूकंपाच्या धक्क्यांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पंचायत समिती पेठचे गटविकास अधिकारी जे.टी. सूर्यवंशी यांनी नुकतीच शाळेला भेट देऊन पाहणी केली. दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासन जागे होणार का, असा सवाल आता पालक आणि ग्रामस्थ विचारत आहेत.

ही मागणी कोणाविरोधात नाही. विद्यार्थ्यांचे प्राण, शिक्षण आणि भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आहे. गांडोळे परिसरात भूकंपाचे धक्के जाणवत असल्याने जीर्ण इमारतीत मुले बसवणे अधिक धोक्याचे आहे. प्रशासनाने तातडीने तांत्रिक तपासणी करून इमारत असुरक्षित असल्यास ती बंद करावी. विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित पर्यायी व्यवस्था करावी आणि नवीन शाळा इमारतीसाठी निधी व मान्यता त्वरित द्यावी. कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने प्रभावी निर्णय घ्यावा.

– रमेश चौरे, सरपंच

# अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी झिरो फॅटॅलिटी डिस्ट्रिक्ट कार्यशाळा

## सेव्ह लाइफ फाउंडेशनचे मिळाले सहकार्य

**नाशिक | प्रतिनिधी**

राज्यातील वाढत्या रस्ते अपघातांमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने नाशिक शहर पोलीस आयुक्तालयात झिरो फॅटॅलिटी डिस्ट्रिक्ट (झेडएफडी) कार्यक्रमांतर्गत विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सेव्ह लाइफ फाउंडेशनच्या सहकार्याने पोलीस मुख्यालयातील भीष्मराज सभागृहात ही कार्यशाळा पार पडली.महाराष्ट्रात रस्ते अपघातांच्या संख्येनुसार देशात तिसरा क्रमांक असल्याच्या पार्श्वभूमीवर अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार नाशिक परिक्षेत्रातील पोलीस अधिकारी, महामार्ग सुरक्षा पथक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय), सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रादेशिक परिवहन




कार्यालय (आरटीओ), नाशिक महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालय आणि इतर संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांसाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

सेव्ह लाइफ फाउंडेशनचे नीलेश सांजुके, वैष्णवी कायलकर, विशाल वायकर आणि आल्पेश चावडा यांनी अपघातांचे विश्लेषण, अपघातप्रवण ठिकाणांची ओळख, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि विविध विभागांमधील समन्वय याविषयी मार्गदर्शन केले.

मद्यपान करून वाहन चालविणे, वेगमर्यादेचे उल्लंघन, बेदरकार वाहनचालक, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे तसेच महामार्गावर जड वाहने उभी करणे या अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या बाबींवर प्रभावी कारवाईची गरजही अधोरेखित करण्यात आली. अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी गोल्डन अवरमध्ये रुग्णालयात दाखल करण्याचे महत्त्वही कार्यशाळेत स्पष्ट करण्यात आले.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक आणि पोलीस उपआयुक्त चंद्रकांत गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेला नाशिक, नाशिक ग्रामीण, अहिल्यानगर, धुळे, नंदुरबार, जळगाव तसेच महामार्ग सुरक्षा पथकातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मालेगावमध्ये पोलिसांचे ऑल आऊट ऑपरेशन

## ६ तासांत ९ अटक, पिस्तुल, दारू, २० दुचाकी जप्त
## १.२९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**मालेगाव | प्रतिनिधी**

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच सराईत गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलिसांनी आज मध्यरात्री मोठी धडक कारवाई केली. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मालेगाव शहरात कॉम्बिंग व ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात आले. या कारवाईत अप्पर पोलीस अधीक्षक, मालेगाव शहर उपविभागाचे सहा. पोलीस अधीक्षक, मालेगाव शहरातील पोलीस ठाण्यांचे ८ प्रभारी अधिकारी, २२ दुय्यम अधिकारी आणि १४८ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. शहरातील विविध ठिकाणी



नाकाबंदी करून संशयितांची झडती घेण्यात आली. अवैध धंदे करणारे, अवैध शस्त्र बाळगणारे आणि रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. या ६ तासांच्या ऑपरेशनमध्ये पोलिसांनी एकूण २० मोटर सायकल, १ पिस्तुल, ९ जिवंत काडतुसे जप्त केली. तसेच गुटख्याची तस्करी करणाऱ्या इसमांवर कारवाई करून ९९ लिटर तंबाखू आणि १ सुरा असा अवैध साठा जप्त केला. अमली पदार्थासह इतर गुन्हेगारांवरही कारवाई करत एकूण १,२९.१०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईदरम्यान मालेगाव शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले. यात पाचर्दी पोलीस ठाण्यात ४ आझादनगरमध्ये १ आणि इतर ठाण्यांमध्ये उर्वरित गुन्ह्यांचा समावेश आहे. या सर्व गुन्ह्यांमध्ये एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. नाशिक ग्रामीण जिल्ह्यातील सराईत गुन्हेगारीवर प्रतिबंध आणि अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तसेच कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी यापुढेही अशाच प्रकारच्या कडक कारवाया सुरू राहतील, असे पोलीस प्रशासनाने सांगितले.